

# आय. ए. एस. डॉ. इंदु राणी जाखड
# धडाकेबाज सनदी अधिकारी

परिचय

**नाव : डॉ. इंदु राणी जाखड (भा.प्र.से.)**
**पदनाम : माजी मनपा आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका तथा विद्यमान जिल्हाधिकारी, पालघर**
**जन्म : २६ ऑगस्ट १९९१**

**सर्वसामान्य माणूस व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहे व तोच या देशाचा मालक आहे. त्याच्या न्याय्य हक्कांसाठीच वर्तमान व्यवस्था प्रस्थापित झाली असल्याने त्याच्या अधिकारांचा संकोच आपल्याकडून चुकूनही नाही झाला पाहिजे, असा निर्भीड व तितकाच लोककेंद्रानुवर्ती बाणा जपत धडाकेबाज निर्णय घेणाऱ्या लोकहितवादी महिला सनदी अधिकाऱ्याची ही संघर्षकथा आहे. जनतेलाच आपले कुटुंब मानणाऱ्या व या कुटुंबाच्या हितासाठी कुणाच्याही दबावाला न जुमानणाऱ्या या धाडसी महिला आयएएस अधिकाऱ्याचे नाव आहे डॉ. इंदु राणी जाखड कल्याण- डोंबिवली महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून गौरविलेल्या व सध्या पालघर जिल्हाधिकारी म्हणून पदभार स्विकारणाऱ्या या तेजस्विनीच्या गौरवांकित जीवनप्रवासाबद्दल...**

आयएएस डॉ. इंदु राणी जाखड यांचे मूळ गाव हरियाणा राज्यातील झज्जर जिल्ह्यामध्ये आहे. मात्र, त्यांचे वडील श्री. वेदप्रकाश जाखड हे दिल्ली पोलिस दलाचे कर्मचारी असल्याने डॉ. इंदु राणी जाखड यांची ओळख दिल्लीकर म्हणून देशभरात झाली आहे. लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार विद्यार्थिनी म्हणून नावाजलेल्या डॉ. इंदु राणी जाखड यांनी राजौरी गार्डनमधील केंब्रिज फाउंडेशन स्कूलमधून आपले शालेय व इयत्ता बारावीपर्यंतचे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. दहावीत सीबीएससी बोर्डातून ९२.८ टक्के गुण मिळविणाऱ्या डॉ. इंदु राणी जाखड यांनी इयत्ता बारावीत ९३.८ टक्के गुण मिळवत अभ्यासातील सातत्य कायम राखले. पुढे सन २००८ मध्ये ऑल इंडिया प्री-मेडिकल टेस्टमध्ये सतराव्या क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या इंदु राणी यांनी दिल्ली विश्वविद्यालयाच्या मौलाना आझाद मेडिकल कॉलेज मध्ये एमबीबीएससाठी प्रवेश घेतला. भारतातील हे दुसऱ्या क्रमांकाचे मेडिकल कॉलेज म्हणून गौरविले जाते.

दरम्यान, मेडिकल इंटर्नशिप करत असताना डॉ. इंदु राणी जाखड यांनी पीजीची एंटरन्स एक्झाम दिली होती. त्या परीक्षेचा निकाल येईपर्यंत कोचिंग क्लास करण्याचे त्यांनी निश्चित केले, कारण पीजीसाठी तीन वर्षे कोचिंग क्लासला जाण्याचा ट्रेंड तेव्हा दिल्लीमध्ये होता.




यूपीएससीच्या अभ्यासाला डॉ. इंदु राणी जाखड यांनी सन २०१४ मध्ये सुरुवात केली. पहिल्याच प्रयत्नात प्रिलिम्स त्यांनी क्रॅक केली. परंतु, त्यावेळी ६२८ वी रँक त्यांना मिळाली. या रँकच्या आधारे त्यांना मेडिकल ऑफिसर बनणे शक्य झाले. परंतु, आपले स्वप्न आयएएस बनण्याचे आहे आणि त्यासाठी आपल्याकडे वेळही आहे. आणखी थोडी मेहनत घेतली तर आपल्या ध्येयापर्यंत आपल्याला पोहोचता येऊ शकते, असा आत्मविश्वास डॉ. इंदु राणी यांना होता. त्यासोबत २०१४ साली UPSC CMS Exam दिली असल्याने त्यांचाही रिझल्ट आला होता आणि त्यातून आरएमएल हॉस्पिटल दिल्ली येथे CMO या पदी २०१५ साली पोस्टींग आली होती. मेडिकल ऑफिसरची ही संधी वाया घालवण्यापेक्षा ती काही काळासाठी स्वीकारणे सयुक्तिक ठरेल, असे मार्गदर्शन वडिलांनी केल्यामुळे डॉ. इंदु राणी जाखड यांनी दिल्लीतील आरएमएल हॉस्पिटलमध्ये चीफ मेडिकल ऑफिसर पदाचा कार्यभार जानेवारी २०१६ मध्ये स्वीकारला. त्यानंतर त्यांनी यूपीएससीच्या २०१५ चा इंटरव्ह्यू दिला. सन २०१६ मध्ये मुख्य परीक्षेत त्यांची रँक ३० वी होती. वडिलांसमवेत बघितलेले आयएएस होण्याचे स्वप्न डॉ. इंदु राणी जाखड यांनी पूर्ण केले होते. घरच्यांच्या आनंदाला पारावर उरला नव्हता. शिकण्याची इच्छा असतानाही वयाच्या अठराव्या वर्षी लग्न करून घरसंसारात रमलेल्या डॉ. इंदु राणी यांच्या मातोश्री सौ. विद्या जाखड यांना तर हा एक सुखद धक्का होता. कारण, मुलीने तिचे शिक्षण पूर्ण करत उच्चपदस्थ अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले होते. दिल्ली शहरात डॉ. इंदु राणी जाखड़ यांचे हे यश अनेक दिवस चर्चिले गेले.

मसुरी येथे आयएएसचे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर डॉ. इंदु राणी यांना महाराष्ट्रात सेवा करण्याची संधी मिळाली. प्रोबेशन पीरियडमध्ये नागपूर जिल्ह्यात त्यांनी सन २०१७ मध्ये डिस्ट्रिक्ट ट्रेनिंग पूर्ण केले. याच काळात. डॉ. इंदु राणी जाखड यांचे लग्न सन २०१४ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी मोहित कुमार गर्ग यांच्यासोबत ठरले. लग्न झाल्यानंतर पुन्हा दिल्ली स्मार्ट सिटी प्राधिकरणात असिस्टंट सेक्रेटरी म्हणून सेवा बजावत डॉ. इंदु राणी जाखड यांनी आपला प्रोबेशन पिरीयड (परिविक्षाधीन कालावधी) सप्टेंबर २०१८ पर्यंत पूर्ण केला. प्रोबेशन पीरियडमध्ये विविध पदांवर काम करण्याची संधी डॉ. इंदु राणी जाखड यांना मिळाल्याने त्यांना चांगला प्रशासकीय अनुभव मिळवता आला. सन २०१९ मध्ये पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीदरम्यान महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी उपविभागासाठी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून त्यांना सेवा बजावण्याची संधी मिळाली. नक्षलग्रस्त भागात सेवा बजावण्याची ही संधी खरं तर धाडसी स्वभावाच्या डॉ. इंदु राणी जाखड यांनी स्वतःहूनच मागितली होती. नक्षलग्रस्त भागात निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून पहिल्या आयएएस महिला अधिकारी होण्याचा मान मिळवत डॉ. इंदु राणी जाखड यांनी आपली सेवा बजावण्यास सुरुवात केली.

पोलिंग पार्टीमध्ये महिला अधिकारी व कर्मचारी यांची वाणवा डॉ. इंदु राणी यांनी अचूक हेरली. याबाबत आपल्या अधिनस्त एका ज्येष्ठ अधिकाऱ्याला विचारणाही केली. तेव्हा महिला या जिकिरीच्या कामासाठी तयार नसतात. पण आपण प्रयत्न केला तर त्यांचा सहभाग या कामात घेणे शक्य असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर डॉ. इंदु राणी जाखड यांनी आपल्या अधीनस्त महिला अधिकारी व कर्मचारी वर्गालाही या प्रक्रियेत सामावून घेत

गडचिरोली जिल्ह्यात पहिल्यांदा बदल घडवून आणला. त्यांचा हा निर्णय महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने संदर्भमूलक ठरला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डॉ. इंदु राणी जाखड यांनी बजावलेली सेवा तेथील सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण करणारी होती. कारण, प्रत्येकाची काळजी घेण्यासह सकारात्मक मानसिकता निरंतर ठेवण्यासाठी डॉ. इंदु राणी यांनी केलेले प्रयत्न व घेतलेले निर्णय महत्त्वपूर्ण होते.

अहेरीच्या एसडीएम व निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कर्तव्य पार पाडल्यानंतर गडचिरोली एसडीएम पदाचाही कार्यभार डॉ. इंदु राणी यांनी पाहिला. एव्हाना, डॉ. इंदु राणी जाखड पाच महिन्यांच्या गरोदर होत्या. मात्र, या काळातच डॉ. इंदु राणी व श्री. मोहित गर्ग या आयएएस–आयपीएस अधिकारी जोडप्याच्या संसारात यानाच्या रूपाने कन्यारत्न जन्माला आले. याना तान्हुली असतानाच डॉ. इंदु राणी जाखड यांची गडचिरोलीहून



रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर पदोन्नतीने बदली झाली. त्या वेळी कोविड–१९ च्या संकटात संपूर्ण जगच होरपळून निघाले होते. परंतु, शासन आदेशाप्रती कटिबद्ध असलेल्या डॉ. इंदु राणी जाखड यांनी रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या सीईओ पदाचा कार्यभार स्वीकारला. कोविडमुळे प्रभावित झालेले जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी सेवा बजावण्याची व दुसरीकडे आई म्हणून लेकीचा सांभाळ करण्याची दुहेरी जबाबदारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्यावर येऊन ठेपली होती. यातून त्यांनी जनहितालाच प्राधान्य दिले व मुलीची काळजी घेण्यासाठी आपल्या सासू–सासऱ्यांवर मोलाची जबाबदारी सोपवली.

कोविड काळात डॉ. इंदु राणी जाखड यांना इच्छा असूनही मुलीला जवळ घेता येत नव्हते, कारण कोरोनाचे संक्रमण या काळात अतिशय तीव्र झाले होते. आपल्यापासून मुलीला धोका नको म्हणून त्यांनी प्रासंगिक ममत्वाचाही त्याग करत जनहिताची काळजी

**वडिलांनी केले प्रेरित**

डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी एमबीबीएस पूर्ण केल्यानंतर इंटर्नशिपसाठी सरकारी हॉस्पिटल गाठले. तेथील रुग्णांवर उपचार करताना त्यांच्या आयुष्यातील दैन्य व दुःखाची जाणीव त्यांना अस्वस्थ करत होती. कुठल्याही विषयावर वडिलांशी विस्तृतपणे बोलण्याची सवय डॉ. इंदु राणी जाखड यांना लहानपणापासूनच होती. वडिलांशी गप्पा मारत असताना त्यांनी सरकारी रुग्णालयातील अनुभव वडिलांसोबत सामायिक केले. आपल्याला या लोकांसाठी काही करता येऊ शकते का, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी जनहिताचा पहारेकरी म्हणून जबाबदारी पार पाडता येऊ शकते का? याबद्दल डॉ. इंदु राणी यांनी आपल्या वडिलांना विचारले. त्यावर वडील उत्तरले, ''का नाही? डॉक्टर बनून रुग्णांवर उपचार करता येतील, पण ज्या व्यवस्थेने त्यांना ग्रासले आहे त्यापासून त्यांची सुटका करायची असेल तर तुला आयएएस बनावे लागेल. तू अभ्यासात हुशार आहेस. ध्येयाप्रती प्रामाणिक आहेस. तू आयएएस प्रीपरेशन करायला काहीच हरकत नाही!'' वडिलांचे हे शब्द डॉ. इंदु राणी जाखड यांना प्रभावित करून गेले. त्याच अनुषंगाने त्यांनी एक सेमिनारही अटेंड केले आणि 'पॉवर ऑफ आयएएस' या शब्दाची व्याप्ती व महत्त्व त्यांच्या लक्षात आले.



वाहिली. या अस्वस्थ वर्तमानात सुदैवाने दोन महिन्यांनंतर पती मोहित गर्ग यांचीही रत्नागिरीच्या पोलीस अधीक्षकपदी वर्णी लागली व डॉ. इंदु राणी यांना मोठा दिलासा मिळाला. परंतु, रत्नागिरी जिल्हा राजकीयदृष्ट्या संवेदनशील असल्याने राजकीय पुढाऱ्यांच्या कुरघोड्या या भागात प्रशासकीय सेवा प्रभावित करत असतात. डॉ. इंदु राणी जाखड यांनाही याचा प्रत्यय आला. अनेक प्रशासनिक निर्णय यादरम्यान प्रभावित करण्याचा प्रयत्न राजकीय पुढाऱ्यांकडून झाला. मात्र, डॉ. इंदु राणी जाखड या निर्भीड व प्रामाणिक अधिकारी म्हणून नावाजलेल्या असल्याने त्यांनी पुढाऱ्यांच्या दबावाला बळी न पडता लोकहिताचे निर्णय घेण्यास सुरुवात केली. त्याचा त्यांना त्रासही सहन करावा लागला. मात्र, डॉ. इंदु राणी जाखड आपल्या लोकहिताच्या सेवेपासून तसूभरही मागे हटल्या नाहीत.

रत्नागिरीत सव्वादोन वर्षे सेवा बजावल्यानंतर डॉ. इंदु राणी व अमित गर्ग यांच्या संसारवेलीवर मुलगा अर्जुनच्या रूपाने दुसरे फूल उमलले. यादरम्यान मॅटर्निटी लिव्हवर असल्याने डॉ. इंदु राणी यांच्याकडे कोणताही पदभार नव्हता. एव्हाना कोविड-१९ चे संकट हळूहळू कमी होऊ लागले होते. पती मोहित गर्ग यांच्यावर मुंबई पोलीस युनिट दोनच्या डीसीपी पदाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. रजा संपल्यावर डॉ. इंदु राणी जाखड यांना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर काम करण्याची संधी मिळाली. महिला सक्षमीकरणाला प्राधान्य देण्यासाठी या संधीचा उपयोग करायचा, हे डॉ. इंदु राणी जाखड यांनी मनोमन ठरवले व पदभार स्वीकारला. महिला सक्षमीकरणाची चळवळ व्यापक व विकसित करण्याच्या दृष्टीने त्यांनी महिला बचत गटांच्या विकासाला प्राधान्य देण्याचे ठरवले. त्यानुसार धोरणे राबवत त्यांनी ग्रामीण भागात महिला सक्षमीकरणासह त्यांच्या आर्थिक प्रगतीला हातभार लावण्यासाठी यंत्रणा कामाला लावली. या प्रशंसापात्र कामामुळे त्यांना भारताच्या प्रतिनिधी म्हणून जर्मनीमध्ये पार पडलेल्या महिला सक्षमीकरण परिषदेत सादरीकरण करण्याची संधी मिळाली.

कल्याण डोंबिवलीच्या पहिल्या महिला आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड यांची बॅच जिल्हाधिकारी पदावर प्रमोट होत होती. डॉ. इंदु राणी जाखड यांनी ही जबाबदारी स्विकारली. गडचिरोली जिल्ह्यात अहेरी उपविभागात प्रथम महिल्या निवडणूक निर्णय अधिकारी होण्याचा मान डॉ. इंदु राणी जाखड यांना मिळाला होता. त्याचीच पुनरावृत्ती कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त म्हणून झाली.

नोव्हेंबर २०२३ मध्ये डॉ. इंदु राणी जाखड यांची कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्तपदी नियुक्ती झाल्यावर त्यांनी विकासकामांचा धडाका सुरू केला. जी विकासकामे विविध कारणांनी प्रलंबित होती, त्या सर्व विकासकामांचे अभिलेखे त्यांनी मागवून घेतले. रात्रंदिवस या अभिलेखांचा अभ्यास करून जी कामे सनदशीर आहेत, त्या सर्व विकासकामांना डॉ. इंदु राणी जाखड यांनी गती दिली. वेगवान प्रशासनाचा अनुभव जनतेला येऊ लागल्याने डॉ. इंदु राणी जाखड यांची लोकप्रियता वाढली. एक महिला अधिकारी असूनही कुणाचीही मुलाहिजा न बाळगता डॉ. इंदु राणी जाखड

**कल्याण डोंबिवलीत डॉ. इंदु राणी जाखड यांच्या कार्यकाळात झालेली कामे**

- समूह विकास योजना राबविण्यास विशेष प्राधान्य.
- कुठलीही करवाढ न करता सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट अंतर्गत इंटिग्रेटेड प्लांटची उभारणी.
- कॅन्सर हॉस्पिटल निर्मितीचे काम सुरू.
- डंपिंग ग्राउंडचा प्रश्न निकाली.
- नव्या अद्ययावत रस्त्यांसह पथदीपांची निर्मिती.
- स्मशानभूमींचे नूतनीकरण व नव्याने बांधणी.
- मनपा शाळांची दर्जावाढ तसेच पहिलीपासून इंग्रजी विषय अध्ययनाची सुविधा.
- उद्यानांचे नूतनीकरण तसेच सुरक्षा.
- करसंकलनासाठी ई-गव्हर्नन्स प्रणालीचा तसेच अभय योजनेचा कौशल्यपूर्वक वापर.
- शासकीय मालमत्तांसाठी स्टेट मॅनेजमेंट मोड्युल तयार करण्याचे काम.
- महिला सक्षमीकरणासाठी विविध शिबिरे तसेच प्रशिक्षणांचे आयोजन.
- सोलर पॉवर निर्मितीत वाढ व कौशल्यपूर्वक वापर.



यांनी कल्याण व डोंबिवली महापालिका हद्दीत केलेली कामे या शहरांना विकासाच्या पथावर घेऊन जाणारी ठरली. पायाभूत सोयीसुविधांचा दर्जा वाढवायचा असेल, तर महसुली उत्पन्न वाढवावे लागेल, हे अचूक हेरत डॉ. इंदु राणी जाखड यांनी टॅक्सगळतीचा शोध घेण्यासाठी समिती नेमली. त्यामुळे मनपाच्या करसंकलनात मोठी वाढ झाली. याशिवाय अनियमित बांधकामे तसेच अतिक्रमण करणाऱ्या बिल्डर लॉबीलाही डॉ. इंदु राणी जाखड यांनी वठणीवर आणले. त्यांच्या या पवित्र्यामुळे बिल्डर लॉबीत काहीशी नाराजी पसरली. परंतु, जे संविधानपूरक आहे, त्याची अंमलबजावणी करण्यात डॉ. इंदु राणी जाखड कधीही मागे हटल्या नाहीत.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या आयुक्त म्हणून डॉ. इंदु राणी जाखड यांनी अनेक विकासकामांना गती दिली. त्यांच्या कल्पक व नियोजनबद्ध संकल्पनेतून शहराचा शाश्वत विकास झाल्याची भावना अनेक नागरीक आज व्यक्त करत आहेत. सौरऊर्जा निर्मितीत डॉ. इंदु राणी जाखड यांनी केलेल्या कामांमुळे मनपाला ऊर्जा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याशिवाय, स्कॉच अवॉर्ड, सीटी ब्युटीफिकेशन अवॉर्ड, अमृत इन्सेंटीव्ह राजीव गांधी गतिमान प्रशासन पुरस्कार अशा अनेकविध अवॉर्डने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला डॉ. इंदु राणी जाखड यांच्या कार्यकाळात गौरविण्यात आले. या अवॉर्डमधून मिळालेला निधीसुद्धा नागरी सोयीसुविधांसाठी वापरत डॉ. इंदु राणी जाखड यांनी सुशासनाचा पाया आपल्या कार्यकाळात कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत रचला. त्यांनी केलेली विकासकामे ही कल्याण डोंबिवलीकरांना आश्वस्त करणारी तसेच पारदर्शक प्रशासनाची हमी देणारी होती, अशा प्रतिक्रिया आता लोकांमधून तसेच माध्यमांमधून उमटत आहेत.

सध्या डॉ. इंदु राणी जाखड यांची नियुक्ती पालघरच्या जिल्हाधिकारीपदी करण्यात आली असून, आता या आदिवासीबहुल जिल्ह्याचे विकसित जिल्ह्यात रूपांतर करण्याचे आव्हान डॉ. इंदु राणी जाखड़ यांनी स्वीकारले आहे.

■